Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी ( 9 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस चालीस :

CLICK HERE



टेस्ट सोडवा

## कविता वाचा व समजून घ्या. ७. धूळपेरणी

कविता पहा

• **ऐका. म्हणा. वाचा.**


असो बरकत
धूळपेरणीला,
लागला मातीचा
जीव झुरणीला.

हिरव्या पिसांचा
ध्यास धरणीला,
टिपूर मोत्यांची
आस मोरणीला.

येऊ नये कधी
दिवस जाचक,
कासावीस डोळे
बनले चातक.

कोरडे नक्षत्र
पूर पापणीला,
आलेलं आभूट
दूर दाटणीला.

मिळता डोळ्यांना
मेघुट इशारे,
मातीच्या कणांना
फुटले धुमारे.



– अशोक कौतिक कोळी

**शब्दार्थ :** **बरकत** – भरभराट. **धूळपेरणी** – पाऊस पडण्यापूर्वी केलेली पेरणी. **आस** – ओढ, इच्छा, अपेक्षा. **जाचक** – त्रास देणारे. **कासावीस** – व्याकूळ. **चातक** – ढगातील पाणी पिऊन राहतो अशी समजूत असलेला एक पक्षी. **आभूट** – ढगाळ आकाश. **मेघुट** – ढग दाटून येणे. **धुमारे** – झाडाला फुटलेली नवी पालवी.

# ३. बेरीज

बेरीज करा.

टेस्ट सोडवा

**स्वाध्याय**

१. बेरीज करा.

(१) ७८५९ + ८५४६

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| + | | | | |
| | | | | |

(२) ८८८८ + ४५७६

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| + | | | | |
| | | | | |

२. उभी मांडणी करून बेरीज करा.

(१) ८५०९ + ३६५८ (२) ९०७६ + ४९५३ (३) ६८४१ + ७५१५

(४) ५७०९ + ७८११ (५) ६८५४ + ३९६३ (६) २८४७ + ९५६३

◆ **बेरीज करा : २४५५८ + ३७**

जर अमित, रूपेश व सुमित यांनी संख्यांची मांडणी खालीलप्रमाणे करून बेरीज केली, तर कोणाची बेरीज बरोबर आली ?

अमितची मांडणी

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| + २ | ४ | ५ | ५ | ८ |
| ३ | ७ | | | |
| ६ | १ | ५ | ५ | ८ |

रूपेशची मांडणी

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| + २ | ४ | ५ | ५ | ८ |
| | | | ३ | ७ |
| २ | ४ | ५ | ९ | ५ |

सुमितची मांडणी

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| + २ | ४ | ५ | ५ | ८ |
| | ३ | ७ | | |
| २ | ८ | २ | ५ | ८ |

रूपेशची बेरीज बरोबर आली. अमित व सुमित यांनी ३७ ही संख्या योग्य स्थानी मांडली नाही. ३७ ही संख्या दोन अंकी आहे. यात ३ दशक व ७ एकक आहेत. दह, ह आणि श या स्थानांत अंक नाहीत. बेरीज करताना एककाखाली एकक, दशकाखाली दशक असे लिहितात. अमित आणि सुमित यांची मांडणी चुकली, त्यामुळे बेरीजही चुकली.

**स्वाध्याय**

बेरीज करा.

(१) १७११ + ४९२५ (२) ११५७ + ९०० (३) २७०९ + ३५

(४) ३७५२ + ४८५ (५) ८०७६ + ५६५ (६) ५७००४ + ३८१६

(७) ८८७०९ + १६५ (८) २७०९५ + ४८०७ (९) ५१०९८ + १९८०३

(१०) ३०० + १५० + ७० + ३५ (११) ४९००० + ४२०० + ६२० + ५४

(१२) ४००० + १६०० + ८०० + ८० + ३२० + ३२

# 3. Addition

टेस्ट सोडवा

- add.

**Exercise**

1. Add the following.

(1) 7859 + 8546

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| + | | | | |
| | | | | |

(2) 8888 + 4576

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| + | | | | |
| | | | | |

2. Arrange vertically and add.

(1) 8509 + 3658 (2) 9076 + 4953 (3) 6841 + 7515

(4) 5709 + 7811 (5) 6854 + 3963 (6) 2847 + 9563

◆ **Add : 24558 + 37**

Amit, Rupesh and Sumit arranged the numbers vertically as shown below. Whose answer is correct ?

**Amit**

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 5 | 5 | 8 |
| + 3 | 7 | | | |
| 6 | 1 | 5 | 5 | 8 |

**Rupesh**

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 5 | 5 | 8 |
| + | | | 3 | 7 |
| 2 | 4 | 5 | 9 | 5 |

**Sumit**

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 5 | 5 | 8 |
| + | 3 | 7 | | |
| 2 | 8 | 2 | 5 | 8 |

Rupesh's answer is correct. Amit and Sumit did not write the number 37 in the right place. 37 is a two-digit number. It has 3 tens and 7 units. There are no digits in the hundreds, thousands and ten thousands places. While adding numbers, we write units under units and tens under tens. Amit and Sumit's arrangements were wrong, therefore, their answers are also wrong.

**Exercise**

Add the following.

(1) 1719 + 4925 (2) 1157 + 900 (3) 2709 + 35

(4) 3752 + 485 (5) 8076 + 565 (6) 57004 + 3816


(7) 88709 + 165 (8) 27095 + 4807 (9) 51098 + 19803

(10) 300 + 150 + 70 + 35 (11) 49000 + 4200 + 620 + 54

(12) 4000 + 1600 + 800 + 80 + 320 + 32

टेस्ट सोडवा

## Listen and understand.



पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

# ४. पिण्याचे पाणी

आपल्या सभोवताली अनेक प्रकारचे सूक्ष्मजीव असतात. ते मातीत, हवेत, पाण्यात, खडकांवर, कुठेही असू शकतात.

अपायकारक सूक्ष्मजीव पाण्यात असले, तरी ते डोळ्यांना दिसत नाहीत. असे सूक्ष्मजीव असणारे पाणी पारदर्शक दिसले, तरी निर्धोक असेल का ?

पावसाळ्यामध्ये बरेच वेळा हगवण किंवा गॅस्ट्रोसारख्या रोगांची साथ येते. अशा वेळी पाणी निर्धोक करण्यासाठी निवळून आणि गाळून घेतलेले पाणी उकळून घ्यावे लागते.

**पाणी उकळल्याने पाण्यातले सूक्ष्मजीव मरतात आणि आजार होण्याचा धोका टळतो.**

### जरा डोके चालवा

पाण्यात काही पदार्थ विरघळत नाहीत. याचा काय फायदा असू शकेल ?

### काय करावे बरे

आईने दुकानातून जिरे आणले होते. पण त्यात चुकून वाळू सांडली. वाळू वेगळी करून आईला पुन्हा स्वच्छ जिरे द्यायचे आहे.

### आपण काय शिकलो

- काही पदार्थ पाण्यात विरघळतात, तर काही पदार्थ विरघळत नाहीत.
- काही वस्तू पाण्यात तरंगतात, तर काही वस्तू बुडतात आणि पाण्याच्या तळाशी जमा होतात.
- गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी ते स्थिर ठेवतात. तळाशी गाळ जमा झाल्यावर पाण्यात तुरटी फिरवतात किंवा पाणी गाळून घेतात.
- गाळलेल्या स्वच्छ पारदर्शक पाण्यातही सूक्ष्मजीव असू शकतात. पाणी निर्धोक करून पिणे आरोग्यासाठी गरजेचे असते. त्यासाठी पाणी उकळून सूक्ष्मजीवांचा नाश करणे आवश्यक असते.

### हे नेहमी लक्षात ठेवा

डोळ्यांना न दिसण्याइतपत लहान सजीवांचेसुद्धा आपल्या जीवनात खूप महत्त्व आहे !

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या. ५. शिवरायांचे शिक्षण

**शिवरायांच्या शिक्षणास प्रारंभ :** स्वत: शहाजीराजे हे संस्कृतचे गाढे पंडित होते. त्यांनी आपल्या बंगळूरच्या दरबारात अनेक भाषांच्या पंडितांना आणि कलावंतांना आश्रय दिला होता. शिवरायांसाठी त्यांनी हुशार शिक्षकांची नेमणूक केली होती. तेथे वयाला सात वर्षे झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. थोड्याच काळात शिवराय लिहिण्या-वाचण्याच्या कलेत पारंगत झाले. रामायण, महाभारत, भागवत यांतील गोष्टी ते स्वत: वाचू लागले. शहाजीराजांनी शिवरायांना युद्धकला शिकवण्यासाठी काही शिक्षकांची नेमणूक केली होती. त्यांनी शिवरायांस घोड्यावर बसणे, कुस्ती खेळणे, दांडपट्टा फिरवणे, तलवार चालवणे इत्यादी विद्या शिकवण्यास प्रारंभ केला. अशा प्रकारे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत शिवरायांना विविध विद्या व कला यांचा परिचय झाला.

लवकरच आदिलशाहाने शहाजीराजांना कर्नाटकातील नायकांची राज्ये जिंकण्याच्या मोहिमेवर पाठवले. या मोहिमेवर जाण्यापूर्वी शहाजीराजांनी जिजाऊ व शिवराय यांची पुणे जहागिरीकडे रवानगी केली. त्या वेळी त्यांच्याबरोबर शहाजीराजांनी हत्ती, घोडे, पायदळ, खजिना, ध्वज, तसेच विश्वासू प्रधान, शूर सेनानी आणि विख्यात शिक्षक यांना धाडले.



शहाजीराजांच्या देखरेखीखाली शिवरायांचे शिक्षण

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here